भारत पेट्रोलियमचे अधिकृत विक्रेते
Bharat Petroleum
Pure for Sure
Pure and Sure
विरा पेट्रोलियम
सर्व प्रकारचे डेबीट कार्ड आणि क्रेडीट कार्ड स्वीकारले जातील.
उपलब्ध सुविधा
२४ तास पेट्रोल- डिझेलची सेवा
वाहन पार्कींगसाठी सुसज्य व्यवस्था
वाहनांसाठी हवा भरण्याची व्यवस्था
पिण्यासाठी फिल्टरचे थंडपाणी
प्रसाधनासाठी स्वच्छ व्यवस्था
विरा पेट्रोलियम
ठिकाण : कोल्हार-लोणी रोड, प्रवरानगर फाटा जवळ, ता. राहाता, जि. अ. नगर
9511356789
विश्वसनीय सेवा, शुद्ध इंधन आणि ग्राहकांचा विश्वास...! | विरा पेट्रोलियम - तुमच्या वाहनाची खरी काळजी

सत्याची बाजू, जनतेचा आवाज!

साप्ताहिक
नगरी समाचार

PRG NO. MHMAR/26/A5926

संपादक : लखन गव्हाणे

विश्वास मोठ्या कंपन्यांचा,
सोलर सोल्यूशन एकच!
RAGHAV ENTERPRISES
विश्वास • गुणवत्ता • सेवा
आम्ही वापरतो फक्त भरोसात्यक ब्रँड्स
vikram VISION IN ACTION
adani Solar
Premier Built to Perform
WAAREE One with the Sun
TATA
UTL SOLAR
गुणवत्तेची 100% हमी
टॉप क्वालिटी वेफर ब्रँड्स
प्रोफेशनल इन्स्टॉलेशन
कमी बीज बिल जास्त बचत
पर्यावरण पूरक हरित ऊर्जा
उत्कृष्ट वॉरंटी आणि सपोर्ट
सोलर लावा, भविष्य उज्ज्वल बनवा!
आजच संपर्क करा!
शैलेश आहेर 9922339908
राहुल धस 9767243842
raghaventerprises1412@gmail.com
गुणवत्ता आमची ओळख, समाधान तुमचा हक्क!

वर्ष १ रे | अंक नं.१८ | पाने ४ | शनिवार, दि. १४ नोव्हेंबर २०२६ | किंमत ३ रुपये

जिल्हा बँकेचे चेअरमनपद जनतेला समर्पित; सहकाराला पुढे नेण्याचे धोरण

डॉ. सुजय विखे पाटील : ज्येष्ठांचे आशीर्वाद आणि सर्वपक्षीय नेत्यांचा विश्वास हीच मोठी ताकद

प्रतिनिधी। नगरी समाचार

लोणी : ज्येष्ठांचे आशीर्वाद आणि जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेत्यांनी दाखविलेला विश्वास यामुळे मिळालेले जिल्हा बँकेचे चेअरमनपद हे माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. या विश्वासाला तडा जाऊ न देता सर्वसामान्य जनता, शेतकरी आणि सहकाराच्या विकासासाठी काम करण्यास आपले प्राधान्य राहील. जिल्हा बँकेच्या माध्यमातून सहकाराला अधिक सक्षम करून बँकेचा नावलौकिक वाढविण्याचे धोरण आपले राहणार असल्याचे प्रतिपादन नूतन चेअरमन डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.

जिल्हा बँकेच्या चेअरमनपदी निवड झाल्यानंतर लोणी येथे कार्यकर्ते, विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थांच्या वतीने आयोजित सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.

डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले, पदाची अपेक्षा न ठेवता काम करणे हा आपला स्वभाव आहे. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या विचारांचा आदर्श घेऊन तसेच ज्येष्ठ नेते व जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मिळाली आहे. हे पद माझे नसून जनतेचे आहे. त्याचा उपयोग सर्वसामान्यांना आधार देण्यासाठी आणि जिल्हा बँकेला अधिक



सक्षम करण्यासाठी केला जाईल.

२५ वर्षांनंतर मिळालेले हे पद जनतेला समर्पित असून हा खऱ्या अर्थाने कार्यकर्त्यांचा विजय आहे. ज्येष्ठ कार्यकर्ते तसेच जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेत्यांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास माझ्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. या विश्वासाची जपणूक करताना शेतकरी, सामान्य नागरिक आणि सहकार क्षेत्राच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. सुजय विखे पाटील यांनी सभापती राम शिंदे, ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील तसेच जिल्ह्यातील सर्व आमदारांचे आभार मानले.

माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के म्हणाले, जिल्हा बँक ही शेतकऱ्यांची कामधेनू असून सर्वसामान्यांसाठी काम करण्याची मोठी संधी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या रूपाने तिसऱ्या पिढीला मिळाली आहे. सर्वांनी एकत्र येऊन सहकार क्षेत्रात सुरू केलेला हा नवा आदर्श राज्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी युवा नेतृत्वाला संधी दिल्याने जिल्हा बँकेचा नावलौकिक आणखी वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील, रणरागिणी महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. धनश्रीताई विखे पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, किसनराव विखे,सोपानराव विखे,अनिल विखे, उपसभापती अण्णासाहेब कडू, ट्रक वाहतूक संस्थेचे चेअरमन नंदूशेठ राहते, व्हाईट चेअरमन सुनील जाधव, प्रवरा फळे-भाजीपाला सोसायटीचे उपाध्यक्ष विजयराव लगड, ज्येष्ठ कार्यकर्ते किसनराव विखे,संपतराव विखे,भाऊसाहेब विखे यांच्यासह डॉ. सुजय दादा विखे पाटील मित्र मंडळाचे कार्यकर्ते, लोणी व प्रवरा परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी डॉ. सुजय विखे पाटील यांचा विविध संस्था तसेच ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

बाभळेश्वर येथे अपघाताच्या कारणावरून एकाला मारहाण

दहा ते बारा जणांच्या टोळक्याकडून घरात घुसूनही मारहाण; लोणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

प्रतिनिधी। नगरी समाचार

बाभळेश्वर : बाभळेश्वर येथे रस्त्यावर झालेल्या अपघाताच्या कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर मारहाणीत झाल्याची घटना घडली. या घटनेत शेतकरी बाबासाहेब शिंदे यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून त्याच्या खिशातील ११ हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतल्याची घटना घडली. त्यानंतर संबंधित व्यक्तींच्या साथीदारांनी घरात घुसून मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची फिर्याद बाबासाहेब साहेबराव शिंदे (वय ४८, व्यवसाय शेती, रा. श्रीरामपूर रोड, बाभळेश्वर, ता. राहाता) यांनी लोणी पोलिसांत दिली. फिर्याद त्याने सांगितले की १२ नोव्हेंबर रोजी रात्री साडेसातच्या सुमारास ते घरी असताना त्यांच्या आई नातेवाईकांना जेवणाचा डबा देण्यासाठी रस्ता ओलांडत असताना तिला दुचाकीस्वाराने जोराची धडक दिली. त्यानंतर माझी आई रस्त्यावर कोसळली. सदर अपघाताची माहिती मिळताच मी आणि माझा भाऊ सचिन आम्ही अपघाताच्या घटनास्थळी गेलो. माझ्या जखमी आईला उपचारासाठी लोणी येथील प्रवरा हॉस्पिटलमध्ये पाठवले.

दरम्यान, रात्री पावणेआठच्या सुमारास अपघातस्थळी थांबलेले असताना अपघात करणाऱ्या व्यक्तीने त्यांचे मित्र व नातेवाईकांना बोलावून घेतले. यावेळी संतोष पवार याने आच्याशी वाद घालत, 'माझे काय करायचे ते करा,' असे म्हणाला आणि त्यानंतर संतोष पवार, संतोष गिऱ्हे आणि त्यांच्यासोबत आलेल्या व्यक्तींनी आम्हाला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच माझ्या शर्टच्या खिशातील ११ हजार रुपये रोख रक्कम काढून घेतली. त्यानंतर संतोष पवार आणि संतोष गिऱ्हे यांच्यासोबत असलेल्या नऊ ते दहा जणांनी एकत्र येऊन आम्हाला मारहाण केली. तसेच शेजारी राहणारे शरद म्हस्के, राहुल म्हस्के आणि नवनाथ शिंदे यांनीही त्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली. एवढ्यावरच न थांबता संबंधित व्यक्तींनी माझा पाठलाग करत माझ्या घरात प्रवेश केला. तेथेही लाथाबुक्क्यांनी मारहाण करून मला शिवीगाळ केली आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याची फिर्याद बाबासाहेब शिंदे यांनी लोणी पोलिसांना दिली. बाबासाहेब शिंदे यांच्या फिर्यादीवरून आरोपी संतोष पवार, संतोष गिऱ्हे व इतर नऊ ते दहा जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ११५(२), ११९(१), ३३३, ३५१(२), ३५२, १८९(२), १९० व १९१(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटनेचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज आठरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल अविनाश मकासरे करत आहे.

धगधगते हिमशिखर हे पुस्तक संघर्षाचा प्रेरणादायी इतिहास : माजी मंत्री बाळासाहेब थोरात

प्रतिनिधी। नगरी समाचार

संगमनेर : तालुक्याला सुसंस्कृत नेतृत्वाची मोठी परंपरा लाभली आहे. के बी दादा यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सातत्याने आवाज उठवला सामाजिक समता निर्माण करण्यासाठी पुढाकार घेतला. त्याकाळची परिस्थिती वर्णन आणि त्यांचे जीवन चरित्र हे नव्या पिढीसाठी प्रेरणादायी असून त्यांच्या जीवनावरील धगधगते हिमशिखर हे पुस्तक संघर्षाचा इतिहास असल्याचे प्रतिपादन माजी शिक्षण व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

ढोले लॉन्स येथे के.बी दादा देशमुख यांच्या जीवनावर आधारित डॉ. संतोष खेडलेकर लिखित धगधगते हिमशिखर या पुस्तकाचे प्रकाशन प्रसंगी कार्यक्रमात ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर डॉ संजय मालपाणी,



मा आ डॉसुधीर तांबे, सौ दुर्गाताई तांबे, निर्मल कुमार देशमुख, सौ अपर्णाताई देशमुख, अनिलराव देशमुख, रामहरी कातोरे, सुधाकर जोशी ,नानासाहेब शिंदे ,बाळासाहेब देशमाने, सौ.अर्चना मुंडे,सौ आरती आरोटे, हिरालाल पगडाल यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, के बी दादा देशमुख यांचा जीवन प्रवास हा संघर्षाचा राहिला आहे. शिक्षणाप्रती त्यांचे मोठे प्रेम होते शिक्षणासाठी घरातून पळून जाऊन त्यांनी संगमनेरला येऊन शिक्षण घेतले. सामाजिक समता निर्माण करण्याचे धाडस त्यांनी केले. लहानपणी वकील होण्याची स्वप्न पाहिले आणि त्या ध्येयातून ते बहुजन समाजातील पहिले वकील झाले. आमदारकी नंतर शेतकऱ्यांचे प्रश्न सभागृहात त्यांनी मांडले.

इतिहास लेखन अवघड काम आहे. विविध घटना व पुस्तकांचा अभ्यास, व्यक्तिमत्वाचा अभ्यास ,प्रवास वर्णन, शोध आणि प्रामाणिकपणा जपत काम करावे लागते .विविध व्यक्तींच्या जीवन प्रवास तपासून त्याची योग्य मांडणी करण्याचे काम डॉ. संतोष खेडलेकर यांनी केले आहे.

तर डॉ.संजय मालपाणी म्हणाले की, के बी दादा देशमुख यांना शिक्षणाविषयी मोठी आत्मीयता होती.जातीभेद नष्ट करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. शिक्षणातून जाती भेदाच्या भिंती नाहीशा करण्याचे काम त्यांनी केले. सुरुवातीच्या काळात न्यायालयाजवळ ते राहायचे खेडेगावातून कोणी आले तर जेवणासाठी त्यांच्याकडे यायचे. मानवतेचा मंत्र त्यांनी समाजाला दिला. मित्र आणि शत्रू त्यांना कायम सम वाटला असे सांगताना सध्या मैदानी खेळ कमी झाले आहेत .हे अत्यंत दुःखदायी असून यामुळे आजार वाढले आहे. त्यामुळे मुलांनी मैदानावर जास्त वेळ खेळले पाहिजे. याकरता पालकांनीही आग्रह करावा असे सांगताना के बी दादांच्या विविध आठवणी त्यांनी जागवल्या.

थोरात कारखाना ३२०० रु. प्रति टन पहिली उचल देणार

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात कारखान्याची पहिली उचल ३२०० जाहीर

प्रतिनिधी। नगरी समाचार

संगमनेर : काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा महाराष्ट्राचे माजी कृषी व महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याने कायम सभासद ,शेतकरी, ऊस उत्पादक यांचे हित जोपासले असून यावर्षी सन २०२६ - २०२७ या गळीत हंगामातील येणाऱ्या उसासाठी पहिली उचल प्रति टन ३२०० रुपये जाहीर केले असल्याची माहिती व्हा.चेअरमन पांडुरंग पाटील घुले यांनी दिली आहे.



याबाबत अधिक माहिती देताना थोरात कारखान्याचे व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील घुले म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याने कायम तालुक्याच्या विकासात योगदान दिले आहे. शिस्त, काटकसर दूरदृष्टी व पारदर्शक काम यामुळे कार्यक्षेत्र व कार्यक्षेत्र बाहेरील शेतकरी व ऊस उत्पादकांचा थोरात कारखान्यावर कायम मोठा विश्वास राहिला आहे.

कारखान्याने सभासद,शेतकरी ऊस उत्पादक यांच्या हिताला कायम प्राधान्य दिले आहे. यावर्षी दुष्काळी परिस्थिती असताना दिवाळीमध्ये कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादकांना २०० रुपये प्रति टन अनुदान दिले आहे. तर कामगारांना २०% बोनस व ३० दिवसांचे सानुग्रह अनुदान दिले आहे याचबरोबर दीपावली मध्ये सुमारे २२ कोटी ११ लाख रुपये बँकेमध्ये शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग केले होते यामुळे संगमनेरची बाजारपेठ फुलली होती.

अलनिनोच्या प्रभावामुळे यावर्षी पाऊस कमी झाला आहे प्रतिकूल परिस्थिती असताना शेतकरी व ऊस उत्पादकांचे हित जोपासण्यासाठी माजी कृषी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली थोरात कारखान्याने कारखान्याने पहिली उचल ३२०० प्रति टन जाहीर केली आहे. यामुळे ऊस उत्पादक व शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. कारखान्याने ३२०० प्रति टन पहिली उचल जाहीर केल्याने शेतकरी व ऊस उत्पादकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून या सर्वांनी कारखान्याचे मार्गदर्शक लोकनेते बाळासाहेब थोरात व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील घुले सर्व संचालक मंडळ व कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांचे अभिनंदन केले आहे.

एसटी वाहकाच्या प्रामाणिकपणाला सलाम

रोकड अन् सोने असलेले पाकीट केले परत



प्रतिनिधी। नगरी समाचार

श्रीगोंदा : आजच्या काळात हरवलेली वस्तू परत मिळणे हीच मोठी गोष्ट झाली आहे. मात्र, दुसऱ्याच्या पैशांवर आणि दागिन्यांवर डोळा न ठेवता ते प्रामाणिकपणे परत करणारे लोक आजही समाजात आहेत, याचा प्रत्यय श्रीगोंदा आगारातील एसटी वाहकाने दिला आहे. बसमध्ये सापडलेले ३ हजार ३०० रुपये रोख, सोन्याचे मणी आणि मंगळसूत्र असलेले पाकीट संबंधित महिला प्रवाशाला परत करून वाहक संदीप सोहेराव चाकणे यांनी माणुसकी आणि प्रामाणिकपणाचा आदर्श निर्माण केला.

दि. ११ नोव्हेंबर २०२६ रोजी श्रीगोंदा आगाराची एसटी बस श्रीगोंदा ते पंढरपूर या मार्गावर धावत होती. पंढरपूर ते करमाळा दरम्यान प्रवास करणाऱ्या रुपाली सुधाकर सांकुळे या महिला प्रवाशाचे मौल्यवान वस्तू असलेले पाकीट बसमध्ये हरवले. हे पाकीट कर्तव्यावर असलेले बस वाहक संदीप सोहेराव चाकणे (रा. चांडगाव, ता. श्रीगोंदा) यांना आढळून आले. पाकिटात ३ हजार ३०० रुपये रोख, सोन्याचे मणी आणि मंगळसूत्र असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.एवढी मौल्यवान वस्तू सापडल्यानंतरही त्यांनी क्षणाचाही मोह न ठेवता तत्काळ संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना याची माहिती दिली. सहाय्यक वाहतूक अधिकारी कर्पे यांच्याशी संपर्क साधून पाकीट सापडल्याचे कळविले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी संबंधित महिला प्रवाशाला बोलावून आगार व्यवस्थापक भोपकर, आगार लेखाकार धांडे आणि अन्य कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत सर्व साहित्य सुरक्षितपणे परत करण्यात आले.आज सार्वजनिक सेवांबाबत अनेकदा तक्रारी ऐकायला मिळतात. मात्र, अशा घटना एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांची सेवाभावी वृत्ती आणि प्रामाणिकपणा अधोरेखित करतात. संदीप चाकणे यांच्या या कृतीचे प्रवासी, एसटी कर्मचारी आणि नागरिकांकडून कौतुक होत आहे.

दोन वर्षांपासून फरार आरोपी कर्जत पोलिसांच्या जाळ्यात

प्रतिनिधी। नगरी समाचार

राशीन : महिलेला कंपनीत भागीदार बनविण्याचे आमिष दाखवून ७ लाख २ हजार ३७२ रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी दोन वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला कर्जत पोलिसांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरूळ येथून अटक केली. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी ही नियोजनबद्ध कारवाई केली. न्यायालयाने आरोपीला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.



संदीप केशव चव्हाण (वय ३०, रा. सिद्धनाथ वडगाव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याने कंपनीत भागीदारीचे आमिष दाखवून महिलेचा विश्वास संपादन केला आणि विविध कागदपत्रांच्या आधारे ७ लाख २ हजार ३७२ रुपयांची फसवणूक केल्याची फिर्याद आहे. याप्रकरणी २७ ऑक्टोबर २०२४ रोजी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ६७९/२०२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर व पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अजिनाथ बटुळे यांनी तपासाची सूत्रे सांभाळली. तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीचा ठावठिकाणा शोधून विशेष पथकाने वेरूळ येथे त्याला अटक केली.

मुलांच्या वाचनाला, ज्ञानाला आणि कल्पनाशक्तीला नवी दिशा!

इयत्ता १ ली ते ५ वीच्या विद्यार्थ्यांसाठी चार विशेष आणि उपयुक्त पुस्तके

आजच्या डिजिटल युगात मुलांना मोबाईल आणि टीव्हीपासून दूर ठेवून त्यांच्या हातात दर्जेदार, मनोरंजक आणि ज्ञानवर्धक पुस्तक देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हीच गरज लक्षात घेऊन -ख पब्लिकेशन्सच्या माध्यमातून इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंतच्या मुलांसाठी चार सुंदर आणि उपयुक्त पुस्तके प्रकाशित करण्यात आली आहेत. या पुस्तकांमध्ये मुलांच्या वयाचा, आकलनशक्तीचा आणि वाचनाच्या सवयींचा विचार करून सोप्या भाषेचा, छोटी-छोटी वाक्ये आणि आकर्षक मांडणीचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे मुलांना पुस्तके वाचणे सोपे जाईल आणि वाचनाची आवड निर्माण होण्यास मदत होईल.



आजच आपल्या मुलांसाठी ही चारही पुस्तके उपलब्ध करून द्या.

१) मराठी - मनोरंजक गोष्टी
२) हिंदी बच्चों की मजेदार कहानियाँ
३) English Story Box
४) Maths The Magic Of Maths

१) मराठी मनोरंजक गोष्टी

मुलांसाठी खास तयार केलेल्या ४० रंजक मराठी गोष्टींचा हा सुंदर संग्रह आहे. गोष्टी मनोरंजक असण्याबरोबरच मुलांना चांगले विचार, संस्कार, सकारात्मक दृष्टिकोन आणि जीवनातील छोट्या-छोट्या गोष्टी समजून घेण्यास मदत करतील अशा पद्धतीने निवडण्यात आल्या आहेत. मुलांना सहज समजेल अशी सोप्या मराठी भाषेतील मांडणी, छोटी-छोटी वाक्ये आणि वाचण्यास सुलभ मजकूर हे या पुस्तकाचे विशेष वैशिष्ट्य आहे. पालकांनी मुलांना गोष्टी वाचून दाखवण्यासाठी तसेच मुलांनी स्वतः वाचन करण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरू शकते.

२) हिंदी बच्चों की मजेदार कहानियाँ

हिंदी भाषेची गोडी निर्माण करण्यासाठी आणि मुलांच्या वाचन कौशल्याला चालना देण्यासाठी ३५ मजेदार हिंदी कहानियाँ या पुस्तकात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.



लेखिका : वैष्णवी अमोल फटांगरे
पब्लिकेशन्स - AI पब्लिकेशन्स
अनमोलवाणी प्रकाशन
एकूण ४ पुस्तके
किंमत ४८६ रू
ऑफर ३४९ रू
मो. ७०३९०१६०६०

सरल और आसान हिंदी भाषा, छोटे-छोटे वाक्य और रोचक कहानियाँ बच्चों को पढ़ने में आसानी और आनंद देती हैं। मनोरंजन के साथ-साथ बच्चों को अच्छी बातें, सकारात्मक विचार और जीवनमूल्य समझाने का प्रयास इस पुस्तक के माध्यम से किया गया है।

३) ENGLISH - STORY BOX

English reading ची सुरुवात करणाऱ्या मुलांसाठी Story Box हे विशेष पुस्तक आहे. या पुस्तकात मुलांना आवडतील अशा २५ ळपींशीशींळपस रपव ाशरपळपसर्षीश्रर्ींीळशी देण्यात आल्या आहेत. Stories are written in simple and easy English with short sentences, making them easier for young learners to read and understand. This book can help children develop their English reading habit, vocabulary and confidence while enjoying interesting stories.

४) MATHS THE MAGIC OF MATHS

गणित हा विषय मुलांना अवघड किंवा कंटाळवाणा वाटू नये, यासाठी The Magic Of Maths हे पुस्तक तयार करण्यात आले आहे. या पुस्तकामध्ये मुलांना गणिताची प्राथमिक ओळख सोप्या आणि आनंददायी पद्धतीने करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. गणितातील मूलभूत संकल्पना समजून घेण्यासाठी आणि गणिताकडे सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरू शकते.

⁂ या चारही पुस्तकांची वैशिष्ट्ये

इयत्ता १ ली ते ५ वीच्या मुलांसाठी उपयुक्त
मुलांना समजेल अशी सोप्या भाषेतील मांडणी
छोटी-छोटी वाक्ये, त्यामुळे वाचनास सोपे
मनोरंजनासोबत ज्ञान आणि चांगल्या मूल्यांची सांगड
मुलांच्या वाचनाची सवय विकसित करण्यास उपयुक्त
मराठी, हिंदी, इंग्रजी आणि गणित या चारही क्षेत्रांचा समावेश
दर्जेदार आणि आकर्षक पृष्ठरचना
मुलांच्या वयाचा आणि आकलनाचा विचार करून तयार केलेली पुस्तके

मुलांच्या हातात मोबाईल नव्हे, पुस्तक द्या!

वाचनाची सवय ही मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठीची पहिली पायरी आहे. चार पुस्तके - चार वेगवेगळे अनुभव मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी एक सुंदर प्रयत्न !

सरकार सत्तेत असताना;अचानक लोकशाही धोक्यात व अराजकता कशी काय निर्माण झाली? याचा अर्थ सरकार चुकीचे निर्णय घेत असावेत

देशातील गंभीर समस्या लपविण्यासाठी;सरकार मोर्चे काढून व विरोधकांना टार्गेट करून आमजनतेपासून पळ काढण्याचा प्रयत्न करीत आहे ही बाब सिद्ध होते.कारण सत्ताधारी पक्ष कधीही मोर्चे काढत नाही.परंतु भारताच्या इतिहासात ही पहिलीच सरकार आहे की, मोर्चे काढून लोकतंत्र बचाओ अराजकता हटावो अशा पध्दतीने देशातील जनतेला भ्रमित करण्याचे काम सरकार करीत आहे.कारण अनपड,गवार, बुध्दीजीवी,विचारवंत हे सर्व हेच म्हणेल की,सत्ता असताना लोकशाही धोक्यात किंवा अराजकता कशी काय निर्माण झाली? यावरून हेच सिद्ध होते की सरकारनेच देशाला धोकादायक स्थितीत आणून ठेवले आहे. देशात लोकांच्या समस्या सरकारपर्यंत पोहचविण्याचे काम विरोधी पक्षाचे असते.त्यानुसार आंदोलन,मोर्चे, उपोषण काढून सरकारला आपल्या किंवा जनतेच्या समस्यांशी अवगत केले जाते.त्यात त्यांच्या मोर्चाची पध्दत वेगवेगळी राहू शकते.परंतु विरोधी पक्ष मोर्चे काढतात आणि त्यांच्यापासुन आपल्याला धोका निर्माण होऊ शकतो म्हणून सरकार पदयात्रेच्या माध्यमातून शक्ती प्रदर्शन करून देशात विरोधी पक्ष अराजकता पसरवित आहे असे म्हणने सरकारला शोभा देणारे नाही.देशात सध्या ज्ञानेश कुमार यांच्या मुद्द्याने देश पेटून उठला आहे . त्याचबरोबर अदानी आणि अंबानी यांचे जाळे सर्वत्र सरकारने पसरविल्याने छोटे उद्योजक यांचे पुर्णपणे दिवाळे निघाले असून वाट लागली आहे व उद्योग संपुष्टात आले आहे यामुळे बेरोजगारी बेसुमार वाढली आहे.ही बाब देशाच्या जनतेच्या व विरोधाकांच्या लक्षात आली असून सर्वत्र आक्रोश निर्माण झाल्याचे दिसून येते त्यामुळे विरोधक आजच्या परिस्थितीत सत्ताधाऱ्यांवर हावी झाल्याचे दिसून येते.याला तोड म्हणून सत्ताधारी अराजकतेच्या नावाखाली मोर्चे काढत आहे. सरकार एकट्या ज्ञानेश कुमारला वाचविण्यासाठी देशभरात लोकतंत्र बचाओ अराजकता हटावो या नावाखाली देशभरात विविध राज्यांमध्ये सत्ताधारी सरकारने विशाल पदयात्रेच्या माध्यमातून मोर्चे काढून शक्ती प्रदर्शन केल्याचे आपण पाहिले. पण सत्ता असतांना हे शक्ती प्रदर्शन कशासाठी?लोकतंत्र अचानक धोकादायक स्थितीत कसा काय आला?व अचानक अराजकता कशी काय निर्माण झाली? अदानी आणि अंबानी विकासाच्या नावाखाली देशातील जंगलसंपदाची राखरांगोळी करीत आहे ही अराजकता सरकारला का दिसत नाही?यावर देशाच्या १४५ कोटी जनतेने मंथन करण्याची गरज आहे. देशात बेरोजगारी, महागाई,शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, अंदाधुंद वृक्षतोड इत्यादींपासून पळ काढण्यासाठी सरकार हे घृणास्पद कार्य करीत असावे.आज देशात विकासाचा नावाखाली मोठ्या प्रमाणात वृक्षतोड सुरू आहे यामुळे देशातील वातावरण आमुलाग्र बदल झाला असून मोठ्या प्रमाणात सर्वत्र प्रदुषण दिसत आहे व देशातील अनेक शहरे जनुकाय गॅस चेंबर झाले की काय अशी परिस्थिती वाढत्या प्रदूषणामुळे निर्माण झाली आहे आणि आता महाराष्ट्रातील ऐतिहासिक वारसा असलेले रायगड जिल्ह्यातील ६०० एकरमधील वृक्ष कटाईकरून टोरंट पॉवर प्रकल्प उभारण्याच्या तयारीत सरकार आहे.त्याचप्रमाणे भीमाशंकर वन्यजीव अभयारण्यापासून सुमारे १६ किलोमीटर अंतरावर, तर भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिरापासून २० किलोमीटर अंतरावर आहे.यासर्व सरकारच्या घटनांचा नागरिक, सामाजिक संस्था, वन्यजीवप्रेमी कडाडून विरोध करीत आहेत.या सर्व घटना लपविण्यासाठी व पडदा टाकण्यासाठी सरकार मोर्चाच्या माध्यमातून देशभरात लोकतंत्र बचाओ अराजकता हटावो अशाप्रकारची लौटनकी करून सरकार देशातील लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहे.सरकार सत्तेत असुन देशाचे प्रश्न सुटत नसतील व मोर्चे काढत असतील तर अशा सरकारचे काय काम? सरकारच्या मोर्चाच्या धोरणावरून स्पष्ट होते की,जनतेच्या प्रश्नांची उत्तरे व समस्या सोडविण्यास सरकार असमर्थ असावी. सरकार मोर्चे काढून आणि विरोधी पक्षांवर टीका टिप्पणी करून कामचुकारपणा करीत असल्याचे दिसून येते देशातील जनतेला सरकारकडून काम हवे असते मोर्चे नाही ही बाब सरकारने लक्षात ठेवली पाहिजे. जनतेच्या समस्या सरकारपर्यंत पोहचविण्यासाठी मोर्चे काढण्याचे काम विरोधकांचे असते आणि ते करीत आहे.सत्ता असतांना देशात सरकार चुकीचे धोरण राबवून ते लपविण्यासाठी मोर्चे काढत असेल तर ही अत्यंत दुर्दैवी बाब म्हणावी लागेल. असेही होवू शकते की,देशातील महत्वपूर्ण विधानपरिषदेतील हार लपविण्यासाठी आणि लोकांचे मन विचलित करण्यासाठी लोकतंत्र बचाओ पदयात्रेचा डाव सरकारचा असू शकतो याला नाकारता येत नाही. सरकार जर कॉग्रेस विरूद्ध भाजप अशीच लढत रहाली तर सर्वसामान्यांचे भवितव्य अंधारात जावू शकते.सरकारने एकमेकांवर टीका टिप्पणी अवश्य करावी. परंतू एकट्या ज्ञानेश कूमारसाठी देश खतरे है, संविधान खतरे मे है किंवा अराजकता वाढत असे म्हणने सरकारला शोभा देत नाही.मी मान्य करतो की विरोधक मोर्चे काढून गुन्हे करीत आहेत.परंतू लोकतंत्र बचाओ अराजकता हटावो च्या नावाखाली देशभरात पदयात्रा काढून ऐन दिवाळीच्या तोंडावर रस्ते जाम करने व याचा त्रास आमजनतेला देणे हे सरकारचे कितपत योग्य म्हणावे! त्यामुळे सरकारच्या या चुकीच्या धोरणामुळे देशात असमणजस्यतेचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येते.आज देशात महागाई भस्मासुरासारखी वाढली, देशात दररोज कुठे ना कुठे शेतकरी आत्महत्या करतांना दिसतो,बेरोजगारी शिगेला पोहोचली आहे,देशासह राज्यात पाणी टंचाईचे भिषण संकट ओढावणार आहे, कोरड्या दुष्काळामुळे शेतकरी संकटात आहे,बेरोजगारीमुळे जेनझीमध्ये आक्रोश निर्माण झाला आहे, विकासाच्या नावाखाली बेसुमार जंगलतोड सुरूच आहे यामुळे मानव,पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतूचा जीव धोकादायक स्थितीत येऊन ठेपला आहे,महागडे शिक्षण,एक झाड १०० माणसांना ऑक्सिजन देतो अशा हजारो झाडांची कत्तल या संपूर्ण गंभीर समस्यांनवर पडदा टाकण्यासाठी सरकार विरोधकांवर पदयात्रेच्या माध्यमातून मोर्चे काढून पलटवार करताना दिसत आहे ही बाब लोकशाहीला शोभा देणारी नसून सत्तधाऱ्यांसाठी शरमेची बाब आहे.ऐन दिवाळीच्या तोंडावर भाजपाने पदयात्रा काढल्याने संपूर्ण वाहतूक चक्का जाम सारखी परिस्थिती निर्माण केली होती.यामुळे नागरिकांमध्ये मोठ्याप्रमाणात रोष सुध्दा दिसून आला.लोकतंत्र बचाओ अराजकता हटावो या सरकारच्या घोषवाक्यावरून असे चित्र दिसत आहे की,देश खरोखरच धोकादायक स्थितीत सरकारने आणुन ठेवला की काय?सरकार आपल्या कार्यप्रणालीवर कुठेतरी चूक करीत असावी त्यामुळे देशात सरकारच्या माध्यमातूनच अराजकता निर्माण झाली असावी असे मला वाटते.सरकार एकीकडे सांगत आहे की, देशातील नक्षलवाद,आंतकवाद संपूष्टात आणला आणि देशात मोठ्या प्रमाणात विकास झाल्याचे सांगितले जाते एवढे सर्व चांगले कामे सरकार करतीत आहे तर देश वाचविण्यासाठी मोर्चे किंवा पदयात्रा हा तमाशा व शोबाजी कशासाठी सरकार करीत आहे. सरकारच्या पदयात्रेवरून व मोर्चा वरून लक्षात येते की, सरकार देशाच्या जनतेपासून बरेच काही लपविण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे सरकार लोकांच्या डोळ्यात धुळफेक करून लोकतंत्र बचाओ अराजकता हटावो असे जेव्हा सरकार स्वतः म्हणत असेल तर सरकार संपूर्ण मोर्चावर निष्फळ (फेल) झाली ही बाब त्यांच्या पदयात्रेवरून सिद्ध होते. म्हणजे सरकार सत्तेसाठी व सरकार वाचवण्यासाठी कोणत्याही स्तरावर जाण्यास तयार असल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे.पुर्वी ज्या मंत्रालयाच्या विभागातून काही चूक झाली तर त्या विभागाचा मंत्री किंवा अधिकारी आपल्या पदाचा राजीनामा देत असे परंतु सध्याच्या सरकारचे वेगळे धोरण असुन ते स्पष्ट म्हणतात की, आमच्या सरकारमध्ये राजीनामा पध्दत नाही मग ते कसेही असो ही बाब धर्मेंद्र प्रधान यांच्या प्रकरणावरून लक्षात येते.परंतु देशातील वाढता दबाव आणि आक्रोश पहाता धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला होता.आता ज्ञानेश कुमार यांची पाळी आली आहे. त्यांनी निवडणूक प्रक्रियेत अनेक घोळ किंवा अडथळे निर्माण केल्याचे सांगितले जाते.त्यामुळे त्यांच्या विरोधात सर्वत्र आक्रोश निर्माण झाला आहे व विरोधी पक्ष त्यांच्या राजीनाम्याची रट धरून आहे.परंतू सरकार कोणत्याही परिस्थितीत ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा घेणार नाही किंवा ज्ञानेश कुमार देणार सुध्दा नाही.सरकारने आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी सरकारने फोडाफोडीचे राजकारण करून व घोडेबाजार करून विरोधी पक्ष संपुष्टात आणण्याचे काम केले.परंतु आता सरकार जेव्हा मोर्चे काढत आहे याचाच अर्थ असा की, सरकारमध्ये कुठेतरी भितीचे वातावरण निर्माण झाली असावी.त्यामुळे सरकारमध्ये असंजस्यतेचे वातावरण निर्माण झाले असून;आपली नाव बुडते की काय! अशी भिती निर्माण झाली आहे.जय हिंद.

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर

सोनईत धारदार शस्त्राने भावाची हत्या; अनैतिक संबंधाच्या संशयातून खुन

प्रतिनिधी। नगरी समाचार

शिंगणापूर : सोनई येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात धारदार चॉपर व चाकूने वार करून रावसाहेब मच्छिंद्र पंडित (वय ४०, रा. धनगर गल्ली, सोनई, ता. नेवासा) यांची हत्या करण्यात आल्याची घटना शुक्रवार, दि. १३ नोव्हेंबर रोजी घडली. या प्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) व ३ (५) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत रावसाहेब पंडित यांचा लहान भाऊ दीपक मच्छिंद्र पंडित (वय ३६) याने दिलेल्या फिर्यादीवरून रोहित भारत सोनवणे (रा. खरवंडी रोड, सोनई) व त्याचा एक अनोळखी साथीदार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी दीपक पंडित हे शेती व मजुरीचे काम करतात. त्यांचे मोठे भाऊ रावसाहेब पंडित हे टाटा एस मालवाहू गाडी चालवून शेतमालाची ने-आण करण्याचे काम करीत होते. रोहित सोनवणे याच्याशी ओळख झाल्यानंतर दोघांमध्ये अनैतिक संबंधांच्या संशयावरून वाद निर्माण झाला होता. याच कारणावरून आरोपींनी राग मनात धरल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

दि. १३ नोव्हेंबर रोजी सकाळी सुमारे ११.४० वाजण्याच्या सुमारास रावसाहेब पंडित हे शिंगणापूरकडे जाणाऱ्या कमाणीजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात असताना रोहित सोनवणे व त्याच्या अनोळखी साथीदाराने त्यांच्यावर धारदार चॉपर व चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात त्यांच्या डाव्या छातीवर, पाठीवर, उजव्या मांडीवर तसेच डाव्या हाताच्या अंगठ्याजवळ गंभीर वार करण्यात आले.

गंभीर जखमी अवस्थेत रावसाहेब यांना प्रथम सोनई येथील प्रथम शताब्दी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. शवविच्छेदन अहवालानुसार छातीवरील वारामुळे रक्तस्राव व धक्का बसल्याने मृत्यू झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी पोलिसांनी मुख्य आरोपीला ताब्यात घेतले असून त्याच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने चौकशी सुरू आहे. मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला असून अंत्यविधीची प्रक्रिया सुरू आहे. घटनेनंतर परिसरात तणावपूर्ण शांतता असून सोनई पोलीस परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

शेतकऱ्यांना मदत करत अमृतवाहिनी बँकेची वाटचाल कौतुकास्पद : बाळासाहेब थोरात

प्रतिनिधी। नगरी समाचार

संगमनेर : सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी निर्माण केली. अत्यंत शिस्तबद्ध आणि पारदर्शक कारभाराची त्यांनी घालून दिलेली परंपरा नव्या संचालकांनी पुढे न्यावी. जिल्हा सहकारी बँक ही शेतकऱ्यांची हक्काची बँक असून ती टिकली आणि वाढली पाहिजे. संगमनेर तालुक्यात अमृतवाहिनी सहकारी बँकेने शेतकऱ्यांना मोठी मदत केली असून तिची वाटचाल कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य तथा माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी काढले.

धांदरफळ बुद्रुक येथील सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँकेच्या १३ व्या शाखेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी खासदार डॉ. कल्याणराव काळे, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, दुर्गाताई तांबे, जिल्हा बँकेचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष रणजितसिंह देशमुख, बँकेचे अध्यक्ष सुधाकर जोशी, उपाध्यक्ष ड. नानासाहेब शिंदे आदी उपस्थित होते.

थोरात म्हणाले, बँकिंग व्यवसायात अनेक अडचणी



असून कर्जवाटप आणि वसुली ही आव्हानात्मक कामे आहेत. रिझर्व्ह बँकेचे कडक निर्बंध पाळूनही अमृतवाहिनी बँकेने चांगली प्रगती केली आहे. बँकेची तेरावी शाखा सुरू झाली असून इगतपुरी तालुक्यात चौदावी शाखा सुरू होत आहे. भाऊसाहेब थोरात यांनी ४४ वर्षे जिल्हा बँकेचे संचालक आणि १८ वर्षे अध्यक्ष म्हणून काम करताना बँकेला शिस्त लावली. त्यांच्या कार्यातून शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी आली.

खासदार काळे म्हणाले, बाळासाहेब थोरात यांच्यासारखे नेतृत्व संगमनेर तालुक्याला लाभले हे भाग्य आहे. त्यांच्या नेतृत्वाची राज्याला गरज असून २०२९ ची निवडणूक त्यांच्या नेतृत्वाखाली लढण्यासाठी कार्यकर्त्यांनी ताकदीने काम करावे.

माजी आमदार डॉ. तांबे यांनी संगमनेरमधील सहकार चळवळ देशाला दिशादर्शक असल्याचे सांगितले. अध्यक्ष सुधाकर जोशी यांनी अमृतवाहिनी बँकेची उलाढाल सुमारे १२०० कोटी रुपये असून भविष्यात ही बँक अनुसूचित बँक होण्याच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे सांगितले. यावेळी रणजितसिंह देशमुख व गणपतराव सांगळे यांचा विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देऊन सन्मान करण्यात आला. स्वागत ड. नानासाहेब शिंदे यांनी केले, तर बापूसाहेब गिरी यांनी आभार मानले.

सायबर फसवणुकाच्या १९३० हेल्पलाइनवर रोज १० हजार कॉल

प्रतिनिधी। नगरी समाचार

श्रीरामपूर : ऑनलाइन आर्थिक फसवणुकीच्या वाढत्या घटनांमुळे राज्यातील सायबर यंत्रणेवरील कामाचा ताण दिवसेंदिवस वाढत आहे. फसवणुकीनंतर मदतीसाठी नागरिकांकडून १९३० या सायबर हेल्पलाइनवर दररोज आठ ते दहा हजार कॉल केले जात आहेत.

तक्रारींची वाढती संख्या आणि नागरिकांना वेळेत मदत देण्यातील अडचणी लक्षात घेऊन राज्य सरकारने सायबर यंत्रणेच्या आधुनिकीकरणासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. महापे येथे अत्याधुनिक सायबर केंद्र उभारण्यासह सामान्य चौकशीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित चॅटबॉट विकसित केला जाणार आहे. तसेच सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी ५०० नवीन पदांची निर्मिती करण्यात येणार आहे.

राज्यातील सायबर यंत्रणेने २०२६ च्या पहिल्या सात महिन्यांत दोन लाखांहून अधिक तक्रारी हाताळल्या आहेत. या तक्रारींशी संबंधित आर्थिक व्यवहारांमध्ये वेळेत हस्तक्षेप केल्यामुळे ५१४ कोटी रुपयांहून अधिक रक्कम सुरक्षित करण्यात यश आले. हा आकडा केवळ १९३० हेल्पलाइनवर प्राप्त झालेल्या तक्रारींचा नसून राज्यातील संपूर्ण सायबर तक्रार निवारण यंत्रणेच्या कामगिरीशी संबंधित आहे.

या पार्श्वभूमीवर महापे येथे उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक

एआय चॅटबॉटसह ५०० नव्या पदांची निर्मिती

सायबर केंद्रात -ख आधारित चॅटबॉटची सुविधा विकसित केली जाणार आहे. तक्रार नोंदविण्याची पद्धत, आवश्यक प्रक्रिया आणि तक्रारीची सद्यस्थिती जाणून घेणे यांसारख्या सर्वसाधारण प्रश्नांची उत्तरे या चॅटबॉटच्या माध्यमातून दिली जातील. त्यामुळे अशा चौकशींसाठी हेल्पलाइन कर्मचाऱ्यांचा वेळ खर्च होणार नाही. परिणामी, प्रत्यक्ष आर्थिक फसवणुकीच्या तक्रारी हाताळणे आणि गरजेनुसार तातडीने प्रतिसाद देणे कर्मचाऱ्यांना अधिक सुलभ होईल, असा शासनाचा दावा आहे. दरम्यान, गुन्ह्यांचे विश्लेषण, संशोधन आणि प्रत्यक्ष तपासाची जबाबदारी पार पाडण्यासाठी ५०० नवीन पदांची निर्मिती करण्यात येत आहे. यामुळे तक्रारींची नोंदणी करण्यापासून आर्थिक व्यवहारांचा मागोवा घेणे आणि संबंधित गुन्हेगारांपर्यंत पोहोचणे या प्रक्रियांना गती मिळण्याची शक्यता आहे.

चॅटबॉटच्या माध्यमातून सर्वसाधारण चौकशीचा भार कमी करणे, १९३० हेल्पलाइनचा प्रतिसाद अधिक तत्पर बनवणे आणि सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी स्वतंत्र मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, अशा तीन स्तरांवर सरकारकडून तयारी सुरू असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.

हे पत्र मालक, प्रकाशन, संपादक लखन रामनाथ गव्हाणे यांनी मुद्रक अद्वित प्रकाश चव्हाण यांच्या अद्वित प्रिंटींग प्रेस, ग्रीन सिटी ३, वर्धा रोड, ऑर्चिड २, ऑक्सिजन पार्कसमोर, गवसी मानापूर, नागपूर, महाराष्ट्र - ४४११०८. (महा.) येथे छापुन शांतिनगर लोणी खु।। ता. राहता-४१३७१३, जि. अहिल्यानगर (महा.) येथे प्रकाशित केले. संपादक :- लखन रामनाथ गव्हाणे, (या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या वृत्तांशी, मजकुरांशी, लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रणदोष संभवणीय. न्यायालयीन वाद राहता न्यायकक्षेत)

मंजूर साकळाई उपसा सिंचन योजनेचे काम तातडीने सुरु करा; पालकमंत्र्यांनी भूमिपूजनाचे आश्वासन पूर्ण करावे

नगर तालुक्यातील हिवरे झरे येथे साकळाई योजना कृती समितीच्या वतीने जनआंदोलन व रास्ता रोको

प्रतिनिधी। नगरी समाचार

अहिल्यानगर : जिरायती भागातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या साकळाई उपसा सिंचन योजनेला राज्य सरकारने मंजुरी देऊन सहा महिन्यांचा कालावधी उलटला आहे. मात्र, अद्याप योजनेच्या कामाचे भूमिपूजन होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिवाळीत भूमिपूजन करण्याचे जाहीर केले होते. त्यामुळे मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांनी दिलेल्या शब्दानुसार तातडीने भूमिपूजन करून योजनेच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी. तसेच दुष्काळामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकरी व पशुपालकांना दिलासा देण्यासाठी चारा छावण्या, चारा डेपो सुरू करावेत किंवा पशुधन वाचविण्यासाठी तातडीने अनुदान जाहीर करावे, या मागण्यांसाठी नगर तालुक्यातील हिवरे झरे येथे दौंड महामार्गावर साकळाई योजना कृती समितीच्या वतीने जनआंदोलन व रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.



या आंदोलनात कृती समितीचे अध्यक्ष ह.भ.प. बाबा महाराज झेंडे, नारायण रोडे, सोमनाथ घाडगे, तुकाराम काळे, रोहिदास उदमले, कुंडलिक कदम, गोरख झेंडे, सोन्याबापू वाणी, अनिल वाणी, प्रतिभा धस, कुलदीप कदम, गोवर्धन कारले, रमेश दळवी, विलास रणसिंगे, देविदास चेमटे, शिवराम शिंदे, संतोष हराळ, सूर्यभान कोतकर, भाऊसाहेब हराळ, रवींद्र कोळेकर, नारायण भापकर, भाऊ पवार, अण्णासाहेब गुंड, ज्ञानदेव हराळ, गंगाराम भापकर, राजू पटेल, संजय तोडमल, युवराज गायकवाड, संतोष रणसिंग, चंद्रकांत शिंदे, अंबादास ठोंबरे, चंद्रकांत पिंपळे आदींसह मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.

यावेळी कृती समितीचे अध्यक्ष ह.भ.प. बाबा महाराज झेंडे म्हणाले की, साकळाई उपसा जलसिंचन योजना जिरायती भागातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. या योजनेमुळे शेतीच्या सिंचनासह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागण्यास मोठी मदत होणार आहे. या योजनेला मंजुरी मिळावी, यासाठी साकळाई योजना कृती समितीच्या वतीने यापूर्वी जनआंदोलन उभारण्यात आले होते. या आंदोलनाच्या माध्यमातून राज्य सरकारने योजनेला मंजुरी दिली. मात्र, मंजुरी मिळून सहा महिने उलटले तरी प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिवाळीत योजनेचे भूमिपूजन करण्यात येईल, असे जाहीर केले होते. त्यामुळे लाभधारक शेतकरी भूमिपूजनाच्या प्रतीक्षेत आहेत. मात्र, शासनदरबारी अद्याप कोणत्याही ठोस हालचाली दिसून येत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांनी दिलेल्या शब्दानुसार योजनेचे भूमिपूजन लवकरात लवकर जाहीर करून प्रत्यक्ष काम सुरू करावे. अन्यथा पुणे महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी आणि पशुपालक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. पाण्याअभावी शेतीचे नुकसान होत असतानाच पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. पशुपालनावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांसमोर जनावरांचे संगोपन करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. त्यामुळे शासनाने तातडीने चारा छावण्या किंवा चारा डेपो सुरू करावेत अथवा पशुधन वाचविण्यासाठी आवश्यक अनुदान जाहीर करावे, अशी मागणी कृती समितीने केली.

शेतकरी आणि पशुपालकांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी शासनाने तातडीने पुढाकार घेऊन आर्थिक मदतीचा हात द्यावा. साकळाई योजनेचे भूमिपूजन आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी चारा व अनुदानाच्या उपाययोजना या दोन्ही प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले आहे. हे आंदोलन कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा नेत्याच्या विरोधात नसून केवळ शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी असल्याचे कृती समितीने स्पष्ट केले.

आंदोलनादरम्यान जलसंपदा विभागाचे उपअभियंता जयराम वाखरडे आणि पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांनी आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारले. यावेळी उपअभियंता जयराम वाखरडे म्हणाले की, एप्रिल २०२६ मध्ये साकळाई पाणी योजनेला मंजुरी मिळाली आहे. ही योजना वन विभागाच्या क्षेत्रातून जात असल्यामुळे वन विभागाची तसेच पर्यावरण विभागाची मान्यता मिळणे आवश्यक आहे. या मान्यतेची प्रक्रिया सुरू असून लवकरच मंजुरी मिळेल आणि प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी आपली मनोगते व्यक्त करत साकळाई पाणी योजनेचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी केली. योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी शासनाने विलंब न करता ठोस निर्णय घ्यावा, अशी भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

पुण्यस्मरणातून माणुसकीचा महासोहळा जामखेडमध्ये ३०० दिव्यांग-निराधारांना अन्नदान

पवार परिवाराचा सेवाभाव ठरला प्रेरणादायी; जीवनोपयोगी वस्तूंचे वाटप, चार मान्यवरांचा पुरस्काराने गौरव

प्रतिनिधी। नगरी समाचार

जामखेड : कै. मोहन भगवान पवार व कै. सचिन मोहन पवार यांच्या पुण्यस्मरणानिमित्त जामखेडमध्ये माणुसकीचा अनोखा जागर पाहायला मिळाला. उद्योगपती तथा सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार यांच्या पुढाकारातून आयोजित सेवाभावी उपक्रमात तब्बल ३०० दिव्यांग व निराधार बंधू-भगिनींना अन्नदान करण्यात आले. यासोबतच त्यांना जीवनोपयोगी वस्तूंचेही वाटप करण्यात आले.



समाजातील गरजू, दीन-दुबळे आणि निराधार व्यक्तींच्या जीवनात आनंद निर्माण करणे हीच खरी समाजसेवा असल्याचे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद सदस्य तथा ज्येष्ठ नेते प्रा. मधुकर (आबा) राळेभात यांनी यावेळी केले. भुकेलेल्यांना अन्नदान करणे हे सर्वांत मोठे पुण्य असून, अशा उपक्रमांमधून समाजात माणुसकी आणि आपुलकीची भावना अधिक दृढ होत असल्याचे त्यांनी सांगितले.

११ नोव्हेंबर रोजी आयोजित या कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या चार मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. नान्नज येथील मनीषा मोहळकर यांना महिला भूषण, सारोळा येथील अनिता ढोले यांना मानवसेवा, जामखेडचे संजय कोठारी यांना समाजभूषण, तर कॅप्टन लक्ष्मण भोरे यांना आदर्श देशभक्त पुरस्काराने गौरविण्यात आले.

यावेळी संतोष पवार यांनी समाजातील दीन-दुबळ्यांची सेवा करण्याचे समाधान शब्दांत व्यक्त करता येणार नाही, असे सांगितले. समाजसेवेचा हा संस्कार आणि सेवाभाव पुढील पिढीपर्यंत अखंडपणे पोहोचविण्याचा आपला प्रयत्न राहील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

कार्यक्रमास प्रा. मधुकर राळेभात, उपमहाराष्ट्र केसरी बबन काशिद, प्रहारचे जिल्हाध्यक्ष विनोदसिंग परदेशी, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रा. कुंडल राळेभात, उपनगराध्यक्ष पोपट राळेभात यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत महाराज निकम यांनी केले.

कै. मोहन भगवान पवार व कै. सचिन मोहन पवार यांच्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित या उपक्रमाने केवळ त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले नाही, तर समाजातील गरजूंना मदतीचा हात देत माणुसकीचाच खरा संदेश जामखेडकरांसमोर ठेवला.

डॉ. सुजय विखे पाटील यांचा भाजप ओबीसी मोर्चाच्या वतीने सत्कार

जिल्हा बँकेच्या चेअरमनपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल सन्मान

प्रतिनिधी। नगरी समाचार

अहिल्यानगर : अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चेअरमनपदी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल भारतीय जनता पक्ष ओबीसी मोर्चाच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. शहरातील केशर गुलाब मंगल कार्यालय येथे आयोजित कार्यक्रमात ओबीसी मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ. विखे पाटील यांचा सन्मान करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



यावेळी सभापती राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, जिल्हा सरचिटणीस संतोष म्हस्के, नगरसेवक दत्ता गाडळकर, निखिल वारे, ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष दादासाहेब सोनमाळी, जिल्हा उपाध्यक्ष गणेश बनकर, अनिल गदादे यांच्यासह भाजप ओबीसी मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

डॉ. सुजय विखे पाटील यांनी जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकरी, महिला आणि युवकांच्या आर्थिक सक्षमीकरणाला प्राधान्य देणार असल्याचे स्पष्ट केले. अल्पभूधारक शेतकरी, महिला बचत गट तसेच स्वतःचा व्यवसाय किंवा स्टार्टअप सुरू करू इच्छिणाऱ्या युवकांना सुलभ कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली. या घटकांना कर्ज मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी, यासाठी एक खिडकी योजनेच्या माध्यमातून सुविधा उपलब्ध करून देण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला.

ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष दादासाहेब सोनमाळी यांनी विखे कुटुंबीयांची शेतकरी वर्गाशी असलेली नाळ अधोरेखित केली. शेतकऱ्यांच्या अडचणी आणि प्रश्नांची त्यांना जाणीव असल्याने डॉ. सुजय विखे पाटील यांच्या नेतृत्वातून जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जिल्हा उपाध्यक्ष गणेश बनकर यांनीही डॉ. सुजय विखे पाटील यांच्या चेअरमनपदाच्या माध्यमातून दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकरी वर्गाला आर्थिक बळ मिळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांचे राज्य व केंद्र शासनाच्या पातळीवरील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठीही जिल्हा बँकेच्या नेतृत्वाचा उपयोग होईल, असे त्यांनी नमूद केले.

शिवमहापुराण ही मानवी जीवनाला संस्कार, सदाचार आणि सकारात्मक विचारांची दिशा देणारी जीवनसृष्टी : पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर व साई द्वारका सेवा ट्रस्टच्या वतीने शिवमहापुराण कथा सप्ताहाचा प्रारंभ

प्रतिनिधी। नगरी समाचार

अहिल्यानगर: शिवमहापुराण ही केवळ धार्मिक ग्रंथकथा नसून मानवी जीवनाला संस्कार, सदाचार आणि सकारात्मक विचारांची दिशा देणारी जीवनसृष्टी आहे. भगवान शिव हे त्याग, तपस्या, करुणा, संयम आणि समतेचे प्रतीक आहेत. 'शिव' या शब्दाचा अर्थच कल्याण असून समाजातील प्रत्येक घटकाचे कल्याण व्हावे, हीच शिवतत्त्वाची शिकवण आहे. भगवान शिवांच्या विचारांत भेदभावाला स्थान नाही. सर्वांना सोबत घेऊन जाण्याची प्रेरणा त्यांच्या जीवनातून मिळते. त्यामुळे हा शिवमहापुराण कथा सप्ताह सामाजिक समरसतेचा संदेश देणारा ठरेल, असे प्रतिपादन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

दिल्ली गेट येथे श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर व श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट यांच्या वतीने तसेच उपमहापौर ड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून आयोजित शिवमहापुराण कथा सप्ताहाचे उद्घाटन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. कथा प्रवक्ते ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या रसाळ वाणीतून या कथेचे निरूपण होत आहे.

यावेळी आमदार संग्राम जगताप, पद्मश्री पोपटराव पवार, , माजी उपमहापौर अनिल बोरुडे, विनायक देशमुख, स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, नगरसेवक निखिल वारे, ऋग्वेद गंधे, दत्ता गाडळकर, रोहन सानप, जालिंदर कोतकर, अभिजीत बोरुडे, मयूर बांगरे, संजय ढोणे, सुशांत जाधव, रवींद्र बारस्कर, जितू गंभीर,रोहन सानप, महिला बालकल्याण उपसभापती वर्षा सानप,गटनेते शारदाताई ढवन मा. नगरसेविका सुप्रिया जाधव आदींसह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.



पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, उपमहापौर ड. धनंजय जाधव यांनी कै. कृष्णाभाऊ जाधव यांच्या विचारांचा वारसा धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून पुढे घेऊन जाण्याचे काम केले आहे. त्यांनी शहरात 'हरित नगर' ही संकल्पना राबवून पर्यावरण संतुलनाचा संदेश दिला आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली शहरात चांगले काम सुरू आहे.

भगवान शिवांचे ध्यान, तपस्या आणि आत्मसंयम युवकांना व्यसनमुक्ती, शिस्त आणि ध्येयपूर्तीचा संदेश देतात. सध्याच्या परिस्थितीत हे संस्कार आचरणात आणण्याची खरी आवश्यकता आहे. अशा कथा सोहळ्यांमुळे नवीन पिढीला भारतीय आध्यात्मिक परंपरा, संस्कार आणि सांस्कृतिक वारशाची ओळख होईल. धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून अंधश्रद्धा, व्यसनाधीनता आणि सामाजिक भेदभाव दूर करून सद्विचार व सामाजिक एकोपा वाढविण्याचा संकल्प या शिवमहापुराण कथेतून केला जात आहे.

शिवमहापुराण कथेचे केवळ श्रवण न करता तिच्यातील विचार आपल्या आचरणात आणूया. भगवान महादेवांच्या विचारांची प्रेरणा घेऊन संस्कारक्षम आणि सेवाभावी समाज निर्माण करूया. ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या वाणीतून यापूर्वी श्री साईबाबांची कथा आणि आता शिवमहापुराण कथेचे आयोजन करून धार्मिक कार्याचा प्रसार व प्रचार केला जात आहे, असेही पालकमंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

आयोजक उपमहापौर ड. धनंजय जाधव म्हणाले की, सिद्धी बागेतील सिद्धेश्वर महादेव मंदिर हे प्राचीन मंदिर असून जागृत देवस्थान म्हणून त्याची ओळख आहे. यानिमित्त कथा प्रवक्ते ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या रसाळ वाणीतून शिवमहापुराण कथेला प्रारंभ झाला आहे. कथा श्रवणासाठी येणाऱ्या भाविकांना बसण्यासाठी दहा हजार खुर्च्यांची व्यवस्था करण्यात आली असून महाप्रसादाचेही आयोजन केले आहे.

पुढील पिढीला केवळ संपत्तीच नव्हे, तर धार्मिक आणि नैतिक संस्कारांचा वारसा मिळावा, या उद्देशाने शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर येथे ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. त्यानंतर पारंपरिक पद्धतीने उत्साहात मिरवणूक काढून कथेला प्रारंभ करण्यात आला, असे त्यांनी सांगितले.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, उपमहापौर ड. धनंजय जाधव यांनी शिवमहापुराण कथेचे आयोजन करून धार्मिकतेचा वारसा जोपासण्याचे काम केले आहे. पुढील पिढीला आध्यात्मिक आणि धार्मिक विचारांची खरी गरज आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन होणे आवश्यक आहे. ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या मधुर वाणीतून संत मंतांचे आणि धार्मिकतेचे विचार पुढे नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य होत आहे, असे त्यांनी सांगितले.

शिवमहापुराण कथा सप्ताहाच्या पहिल्या दिवशी कथा प्रवक्ते ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी शिवमहापुराण माहात्म्य आणि विद्येश्वर संहितेचे निरूपण केले. भगवान महादेवांचे महत्त्व मानवी जीवनात किती अनन्यसाधारण आहे, हे विविध उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी स्पष्ट केले.

ते म्हणाले की, विष ओठात आणि पोटातही असू नये. पोटात विष असेल तर आपण मरतो, तर ओठात विष असेल तर दुसरा माणूस मरतो. चांगल्या व्यक्तींना आपण चांगले म्हणत नाही, तोपर्यंत वैभवशाली जीवन जगता येणार नाही. केवळ कपाळाला गंध लावल्याने काही साध्य होत नाही, तर आपल्या चारित्र्याचा सुगंध सर्वत्र दरवळला पाहिजे. भोलेनाथ हे सर्वांचे देव आहेत. सत्य, सदाचार आणि चांगल्या विचारांचे महत्त्व जीवनात जपले पाहिजे, असे सांगत त्यांनी विविध उदाहरणांमधून उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

चीनमधील बुद्धिबळ खेळणारा अत्याधुनिक रोबोट प्रथमच अहिल्यानगरमध्ये

शांतीकुमारजी फिरोदिया अखिल भारतीय खुल्या आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा दिमाखात शुभारंभ; देशभरातून २५० हून अधिक खेळाडूंचा सहभाग

प्रतिनिधी। नगरी समाचार

अहिल्यानगर : बुद्धिबळ खेळाच्या प्रचार आणि प्रसारासाठी अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शांतीकुमारजी फिरोदिया अखिल भारतीय खुल्या आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ सोहम फिरोदिया आणि अनुष्का फीरोदिया यांच्या हस्ते बुद्धिबळ पटावर चाल देऊन स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, मान्यवर, खेळाडू आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अहिल्यानगर येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, एस.टी. स्टँड रोड येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे सर्वांत मोठे आकर्षण म्हणजे चीनमधून आणण्यात आलेला अत्याधुनिक बुद्धिबळ खेळणारा रोबोट! हा रोबोट प्रत्यक्ष खेळाडूंशी बुद्धिबळाचा डाव खेळत असून, अहिल्यानगरमध्ये प्रथमच बुद्धिबळप्रेमींना रोबोटसोबत खेळण्याची अनोखी संधी उपलब्ध झाली आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि बुद्धिबळ यांचा संगम अनुभवण्यासाठी खेळाडू, पालक आणि नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता आहे.

स्पर्धेच्या प्रारंभी संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी संघटनेच्या कार्याची माहिती देताना सांगितले की, या स्पर्धेचे विशेष आकर्षण असलेल्या अत्याधुनिक बुद्धिबळ रोबोटसोबत खेळण्याची संधी खेळाडूंना मिळणार आहे. त्यामुळे खेळाडूंना एक आगळावेगळा अनुभव घेता येणार असून, बुद्धिबळाच्या खेळाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्याचा संघटनेचा प्रयत्न आहे.

जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, अहिल्यानगरमधून बुद्धिबळ खेळाचा प्रचार आणि प्रसार सातत्याने होत आहे. दरवर्षी संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या स्पर्धांना मोठ्या संख्येने खेळाडू सहभागी होतात. बुद्धिबळ खेळाडूं साठी शंभरहून अधिक बुद्धिबळ इंटरनॅशनल वुडन बोर्ड उपलब्ध करून देण्या बरोबरच आता चीनमधील अत्याधुनिक रोबोट आणण्यात आला आहे. रोबोट सोबत



खेळण्या मुळे खेळाडूंचा खेळ अधिक दर्जेदार होण्यास मदत होईल. भारतामध्ये शंभरहून अधिक ग्रँडमास्टर झाले असून, अहिल्यानगर मधून ही अजुन एक ग्रँडमास्टर तयार करण्यासाठी संघटना कटिबद्ध आहे. बुद्धिबळ हा असा खेळ आहे की, तो एकट्या व्यक्तीलाही मोबाईल वर खेळता येतो. त्यामुळे बुद्धिबळाचा अधिकाधिक प्रचार आणि प्रसार व्हावा, हा आमचा मानस आहे. आधुनिक युगा नुसार बुद्धिबळा साठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या स्पर्धेत देशभरातून २५० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदविला आहे. दिव-दमण, गुजरात, झारखंड, कर्नाटक, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, तेलंगणा आणि पश्चिम बंगाल आदी राज्यांमधून खेळाडू सहभागी झाले आहेत. तसेच महाराष्ट्रातील यवतमाळ, वर्धा, ठाणे, सोलापूर, कोल्हापूर, सातारा, पुणे, सांगली, रत्नागिरी, रायगड, छत्रपती संभाजीनगर, पालघर, नाशिक, नांदेड, नागपूर, मुंबई, जालना, जळगाव, हिंगोली, धुळे, धाराशिव, चंद्रपूर, बुलढाणा, बीड आणि अकोला येथील खेळाडूंनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला आहे.

या स्पर्धेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे खेळाडूंच्या वयोगटातील विविधता. अवघ्या साडेचार वर्षांच्या बाल खेळाडू पासून ते ८७ वर्षांच्या ज्येष्ठ खेळाडूपर्यंत विविध वयोगटातील बुद्धिबळपटू आपले कौशल्य पणाला लावत आहेत. चीनमधून आलेला बुद्धिबळ खेळणारा यंत्रमानव खेळाडूंशी प्रत्यक्ष डाव खेळणार असल्याने नगरमधील तसेच बाहेरगावच्या खेळाडूंना त्याच्यासोबत बुद्धिबळ खेळण्याची संधी मिळणार आहे. बुद्धिबळ खेळाडू, पालक आणि प्रशिक्षकां साठी हा अनुभव विशेष ठरणार असल्याची माहिती संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी दिली. या वेळी जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी, सचिव यशवंत बापट, सुबोध ठोंबरे, शाम कांबळे, पारुनाथ ढोकळे, संजय खडके, प्रकाश गुजराथी, स्वप्निल भगुरकर विशाल गुजराथी, दत्ता घाडगे, संजय जोशी, मनीष जसवानी, चेतन कड, पंच प्रवीण ठाकरे, पवन राठी, शार्दुल तापसे, शिशिर इंदुरकर, विजय चोरडिया, प्रशांत धंगेकर, देवेंद्र ढोकळे, अनुराधा बापट, शुभदा ठोंबरे, रोहिणी आडकर आदींसह खेळाडू आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गोधेगावातील जबरी चोरीचा नेवासा पोलिसांकडून छडा; तिघे आरोपी जेरबंद



प्रतिनिधी। नगरी समाचार

नेवासा : घरात घुसून कुटुंबीयांना मारहाण करीत तरुणीच्या गळ्याला चाकू लावून सोन्याचे दागिने व मोबाईल असा सुमारे ५९ हजार रुपयांचा मुद्देमाल लुटणाऱ्या टोळीचा नेवासा पोलिसांनी छडा लावला आहे. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली असून, गोपनीय बातमीदाराच्या माहितीच्या आधारे पोलिसांनी ही कारवाई केली.

नेवासा तालुक्यातील गोधेगाव येथे १७ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री १०.४० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली होती. फिर्यादी व कुटुंबीय घरात झोपलेले असताना तीन अनोळखी व्यक्तींनी दरवाजा उघडून घरात प्रवेश केला. फिर्यादीला खाली पाडून टणक हत्याराने मारहाण केली. तसेच फिर्यादीच्या बहिणीच्या मुलीच्या गळ्याला चाकू लावून तिच्यासह फिर्यादीकडील सोन्याचे दागिने व मोबाईल जबरदस्तीने हिसकावून नेला होता. याप्रकरणी १८ सप्टेंबर रोजी नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यात बहिरवाडी येथील सुभाष दिलीप शिंदे याचा सहभाग असल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना मिळाली. त्यानुसार उपनिरीक्षक विकास पाटील व पथकाने शिंदे याला ताब्यात घेऊन चौकशी केली. त्याने साथीदारांसह गुन्हा केल्याची कबुली दिल्यानंतर अभिषेक दत्तात्रय मोटे आणि पोपट बाबासाहेब गाडेकर (दोघे रा. गोधेगाव) यांचाही सहभाग उघड झाला. पोलिसांनी तिघांनाही अटक केली आहे. त्यांच्याकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, कोणताही तांत्रिक पुरावा उपलब्ध नसताना गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी गुन्ह्याचा तपास पूर्ण केला. पोलीस अधीक्षक एम. सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे व उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, उपनिरीक्षक विकास पाटील यांच्यासह नेवासा पोलीस पथक व श्रीरामपूर सायबर सेलच्या कर्मचाऱ्यांनी ही कामगिरी केली.

जन्मभूमी बिल्वपुरीने जे दिले, त्यासाठी शब्द अपुरे : स्वामी गोविंददेव गिरी

बेलापूर हे हिंदू-मुस्लिम एकात्मतेचे उत्तम उदाहरण

प्रतिनिधी। नगरी समाचार

बेलापूर : बदल स्वीकारण्याची तयारी असेल, तर माणूस कोणत्याही परिस्थितीवर मात करू शकतो. प्रत्येकाने आपल्या मर्यादेत राहून विकास साधावा. हिंदू-मुस्लिम एकात्मतेचे बेलापूर हे उत्तम उदाहरण आहे. माझ्या सर्वांगीण जडणघडणीत जन्मभूमी बिल्वपुरीने भरभरून योगदान दिले. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शब्दही अपुरे आहेत, असे भावोद्गार राष्ट्रसंत स्वामी गोविंददेव गिरी यांनी काढले.

दीपावलीनिमित्ता भाऊबीजेच्या दिवशी नव्या बालाजी मंदिरात आयोजित कार्यक्रमात ते भाविकांशी संवाद साधत होते. अयोध्येतील श्रीराम मंदिर ट्रस्टच्या महासचिवपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर प्रथमच गावी आलेल्या स्वामींचे फटाक्यांची आतषबाजी आणि 'जय श्रीराम'च्या जयघोषात उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

राष्ट्रधर्मद्रोही शक्तींविरोधात बौद्धिक योद्ध्यांनी एकजूट करावी

स्वामी गोविंददेव गिरी म्हणाले की, भारताची प्रगती रोखण्यासाठी काही विदेशी शक्ती मोठ्या प्रमाणात पैसा खर्च करीत आहेत. दुर्दैवाने देशातील काही राष्ट्रविरोधी शक्तीही त्यांना साथ देत आहेत. आधुनिक रामायण चित्रपटात धर्म, संस्कृती आणि प्रेमाचे महत्त्व कमी करून रावणाला नायक बनविण्याचा प्रयत्न झाला आहे. सनातन परंपरेचा गौरव करणारी दृश्ये टाळण्यात आली आहेत. अशा प्रवृत्तींविरोधात बौद्धिक योद्ध्यांनी एकजूट होऊन उभे राहण्याची गरज आहे. देशाच्या विकासासाठी प्रत्येकाने संस्कारित, सावध आणि जागरूक राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जुने बालाजी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष हरिप्रसाद व्यास, सचिव आचार्य महेश व्यास आणि विश्वस्त डॉ. रवींद्र पांडे यांनी स्वामींचे स्वागत केले. विविध क्षेत्रांत



योगदान देणारे डॉ. श्रीकृष्ण काळे, हरिभाऊ डावरे, भास्कर खंडागळे आणि कल्याणी काळे यांना प्रत्येकी ११ हजार रुपये व गौरवपत्र देऊन स्वामींच्या हस्ते 'बेलापूर भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

अरुणकुमार मुंदडा यांच्या संकल्पनेतून स्वामींच्या जीवनप्रवासावर आधारित विशेषांकाचे प्रकाशन महंत स्वामी नारायण गिरी, ह.भ.प. रवींद्र मुठे आणि दत्तात्रय बहिरट यांच्या हस्ते करण्यात आले. सोनई येथील चांडक परिवाराच्या वतीने पाद्यपूजन करण्यात आले. यावेळी स्वामींनी गावातील विविध देवतांचे दर्शन घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. गरजू कुटुंबांना फराळाचे वाटपही करण्यात आले. महाआरती व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. प्रा. ज्ञानेश गवले यांनी सूत्रसंचालन केले, तर आचार्य महेश व्यास यांनी आभार मानले.

ओम शांती केंद्रात आ. लंघे यांच्या उपस्थितीत भाऊबीज उत्साहात

प्रतिनिधी। नगरी समाचार

नेवासा : येथील श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय परिसरातील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या ओम शांती केंद्रात आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या उपस्थितीत भाऊबीज उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली.

ओम शांती केंद्राच्या माध्यमातून सकारात्मक ऊर्जा आणि आत्मिक शांतीची अनुभूती मिळते. येथील आध्यात्मिक वातावरणामुळे समाजात चांगल्या विचारांची रुजवण होऊन सामाजिक व विधायक कार्य करण्याची प्रेरणा मिळते, असे प्रतिपादन आमदार लंघे यांनी केले. केंद्राच्या उत्कर्षासाठी आणि वैभवात भर घालण्यासाठी आवश्यक ती सेवा करण्यास आपण सदैव तत्पर असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी वंदना दीदी यांनी मान्यवरांचे स्वागत केले. केंद्राच्या प्रमुख राजयोगिनी सरला दीदी यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या आध्यात्मिक व सामाजिक उपक्रमांची माहिती दिली.

यावेळी माउंट अबू येथील बाबा भाईजी, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, माजी सभापती शंकरराव लोखंडे, राजयोगिनी वंदना दीदी, लता दीदी, समृद्धी दीदी, वैद्य जाकीरभाई शेख, अंकुशराव काळे, सुरेशराव उभेदळ यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

कष्टकऱ्यांच्या दिवाळीत ज्ञानरचना फाउंडेशनने फुलविला आनंदाचा गोडवा

भिंगारमधील काच, कागद आणि भंगार गोळा करून उदरनिर्वाह करणाऱ्या गरजू कुटुंबांना किराणा किटचे वाटप

प्रतिनिधी। नगरी समाचार

अहिल्यानगर : कोणासाठी दिवाळी म्हणजे रोषणाई, फराळ, नवीन कपडे आणि आनंदाचा उत्सव; तर कोणासाठी दोन वेळच्या अन्नाची भ्रांत मिटविण्याची धडपड! रोज काच, कागद आणि भंगार गोळा करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या कष्टकरी कुटुंबांच्या आयुष्यातही दिवाळीचा आनंद फुलावा, त्यांच्या घरातही सणाचा गोडवा निर्माण व्हावा, या संवेदनशील भावनेतून ज्ञानरचना सोशल फाउंडेशनने माणुसकीचा अनोखा दीप प्रज्वलित केला. फाउंडेशनच्या वतीने भिंगार परिसरातील गरजू कुटुंबांना दिवाळी फराळ तयार करण्यासाठी आवश्यक किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले.

दिवाळीच्या सणात प्रत्येक घरात आनंदाचे वातावरण असते. मात्र, समाजातील काही कुटुंबांना आर्थिक परिस्थितीमुळे सणाचा आनंदही मर्यादित स्वरूपात साजरा करावा लागतो. विशेषतः काच, कागद आणि भंगार संकलित करून मिळणाऱ्या उत्पन्नावर संसाराचा गाडा ओढणाऱ्या कुटुंबांचा संघर्ष मोठा असतो. दिवसभर कष्ट करूनही त्यांच्या कुटुंबाच्या मूलभूत गरजा पूर्ण करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा कष्टकरी कुटुंबांच्या जगण्यातील संघर्षाची जाणीव ठेवून त्यांच्या दिवाळीत आनंदाचे चार क्षण निर्माण करण्यासाठी ज्ञानरचना सोशल फाउंडेशनने सालाबादप्रमाणे यंदाही हा सामाजिक उपक्रम राबविला.

ज्ञानरचना सोशल फाउंडेशनच्या संचालिका सौ. सुप्रिया चौधरी आणि सारिका शेलार यांच्या हस्ते गरजू कुटुंबांना किराणा किटचे वाटप करण्यात आले. दिवाळीचा फराळ तयार करण्यासाठी आवश्यक साहित्य मिळाल्याने या कुटुंबांनाही सण साजरा करण्यासाठी मोलाचा आधार मिळाला. मदतीचे स्वरूप केवळ किराणा साहित्यापुरते मर्यादित नसून, समाजातील कष्टकरी घटकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची आणि त्यांच्याप्रती आपुलकी व्यक्त करण्यात आली.

समाजातील गरजू व्यक्तींना मदत करणे म्हणजे केवळ वस्तूंचे वाटप करणे नव्हे, तर त्यांच्या संघर्षाची दखल घेऊन त्यांना आपणही समाजाचा महत्त्वाचा घटक आहोत, ही जाणीव करून देणे होय. कष्टकरी कुटुंबांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलावे, त्यांच्या मुलांनाही दिवाळीचा आनंद अनुभवता यावा आणि त्यांच्या घरातही फराळाचा गोडवा दरवळावा, या भावनेतून फाउंडेशनने पुढाकार घेतला.

ज्ञानरचना सोशल फाउंडेशन मागील चार वर्षांपासून समाजातील



आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजू आणि वंचित घटकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. केवळ तात्पुरती मदत करण्यापेक्षा गरजू व्यक्तींना स्वावलंबी बनविणे, त्यांच्या अंगी असलेल्या कौशल्यांना वाव देणे, महिलांना सक्षम करणे आणि समाजातील गुणवंतांच्या कार्याला प्रोत्साहन देणे, हा फाउंडेशनच्या कार्याचा मुख्य उद्देश आहे.याअंतर्गत शैक्षणिक क्षेत्रात गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी 'एज्युकेशनल मटेरियल बँक', महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी 'महिला सक्षमीकरण व कौशल्य विकास', विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी 'कर्तृत्वाचा सन्मान', गरजू कुटुंबांसोबत दिवाळीचा आनंद साजरा करण्यासाठी 'दिवाळी आनंदोत्सव', कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी 'दीपसंध्या' हा सांस्कृतिक उपक्रम तसेच गरजू आणि वंचित घटकांना मदतीचा हात देणारे विविध सामाजिक उपक्रम वर्षभर राबविण्यात येतात.